# दहा जेम्स बाँडचा ऐवज

डॉ. प्रियदर्शन मनोहर, पिट्सबर्ग, पेन्सिल्वेनिया

जेम्स बाँड आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहे. ब्रिटीश हेर खात्यातला अधिकारी. उंच, बळकट, धाडसी, साहसी, रुबाबदार, पट्टीचा नेमबाज. शत्रूला यमसदनी धाडण्याचा परवाना बाळगणारा. कार, बोट, पाणबुडी, रणगाडा, विमान, हेलिकॉप्टर, अगदी अवकाशयानसुद्धा लीलया चालवू शकणारा. नेमके डाव जिंकणारा जुगारी. समोरच्या माणसाच्या मनातला हेतू ओळखू शकणारा धूर्त. प्रत्येक डावाला प्रतिडाव टाकणारा कावेबाज. प्रत्येक मदालसेच्या मनात लालसा उत्पन्न करणारा मदनाचा पुतळा. ज्याचं संपूर्ण आयुष्य म्हणजे प्रचंड वेगाने उलगडत जाणारी चित्तथरारक घटनांची अखंड मालिकाच! ह्या माणसाच्या दिमतीला नवनवी Hi Tech गॅजेटस् निर्माण करणारे शास्त्रज्ञ आणि अद्ययावत प्रयोगशाळाच दिलेली आहे. घड्याळातून बाहेर पडणारे ताकदवान लेझर असोत नाहीतर शक्तीमान चुंबकीय क्षेत्र असो; त्याच्या कारची पाणबुडी होवो; नाहीतर तिच्यात रॅकेट लाँचर असो; कदाचित त्याची बॅकपॅक उलगडून त्याचं ग्लायडर होवो; नाहीतर ब्रीफकेस मधून अश्रूधूर बाहेर पडो; त्याच्या पेनमधून विषानं मारलेला बाण बाहेर पडो नाहीतर पेनाचा हातबाँबसारखा स्फोट होवो; कितीही अर्तक्य घटना घडत असल्या, आजूबाजूला मरणांचा वर्षाव होत असला, तरी हा शांतचित्तानं ध्येयपूर्तीकडे वाटचाल करीत राहतो.

एखाद्याला वाटेल की जेम्स बाँड ही व्यक्ती आणि त्याच्या करामती म्हणजे लेखकाच्या परिकथा आहेत. प्रत्यक्षात असं असूच शकत नाही. ज्यांना ज्यांना असं वाटत असेल त्यांनी त्यांनी जॉन ग्लेन ह्या माणसाची जीवनगाथा वाचावी म्हणजे त्यांना पटेल की हा माणूस एक नव्हे तर दहा जेम्स बाँडचा ऐवज आहे. १९२१ साली केंब्रिज, ओहायो येथे जन्मून केवळ अडीच हजार लोकसंख्या असलेल्या जवळच्याच न्यू काँकॉर्ड गावी वाढलेला एक खेडूत. पणजोबा अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात युनियनच्या बाजूने लढलेला सैनिक. आजोबा शेतावर अखंड मेहनत करणारे साधेसुधे शेकतरी. वडील पहिल्या महायुद्धात फ्रान्समध्ये युद्ध करुन परतलेले. रणगाड्यांचे कर्कश आवाजाने त्यांचे दोन्ही कान अधू झालेले. आई प्राथमिक शाळेत शिक्षिका. घरात शौर्याचं आणि देशभक्तीचं वातावरण. खास अमेरिकन स्वभाव वैशिष्ट्य म्हणून जाणारी स्वातंत्र्यप्रियता रक्तात भरपूर भिनलेली. एकुलता एक मुलगा. आईची ओटी भरत होती पण दुसरं बाळ होत नव्हतं. शेवटी एक दिवस आई बाबांनी छोट्या जीनला दत्तक घेतलं. जॉनने नव्या बहीणीवर मनापासून प्रेम केलं.

जॉन आठ वर्षाचा असताना त्याच्या बाबांबरोबर कारमधून जात होता. जवळच्या एका शेतात एक छोटं विमान उभं राहीलेलं त्यांना दिसलं. बाबांनी गाडी विमानाजवळ नेली आणि जॉनला म्हणाले, "मित्रा! काय म्हणतोस? जायचं का विमानातून फेरी मारायला?" ओहायोच्या प्रत्येक छोट्या मुलाला डेटन, ओहायोच्या राईट ब्रदर्सनी निर्माण केलेल्या विमानाच प्रचंड अभिमान! पण पुस्तकातून भेटणारं विमान प्रत्यक्षात इतक्या जवळून कधी पहायला मिळालं नव्हतं. मन आनंदानं उसळ्या मारु लागलं पण तोंडातून शब्द फुटेना. "हे बघ पोरा, तू असा घाबरणार असलास तर इथेच कारमध्ये बस बापडा – कारण मी चाललो!" बाबांनी तंबी दिली. वैमानिकाला पैसे मिळताच ग्लेन पिता पुत्रांनी विमानातून पहिली चक्कर मारली. त्या अद्‌भूत थरारातच जॉन ग्लेनचं जेम्स बाँडमध्ये रुपांतर झालं होतं! आता जॉनला आकाशाचं आणि विमानाचं वेड लागलं.

इथे नियतीने फासा टाकला. १९३०साल उजाडलं होतं. जागतिक मंदीचे वारे वाहू लागले होते. दोन वेळेच्या अन्नाच्या शोधार्थ माणसांचे कळप फिरु लागले होते. दारोदारी अन्न पाणी मागत हिंडू लागले. काबाडकष्ट करुन, परसदारी शेती करुन, कुटुंबाचं पोट भरता भरता जॉनची आई दारी आलेल्या पांथस्थाला उपाशी जाऊ द्यायची नाही. मग तो चोर–दरोडेखोर का असेना. "कोणतीही गोष्ट फुकट घालवण्यासारखं महापाप नाही." अशी वाक्य त्याच्या कानावर पडू लागली. माझी आई आमच्या घरी जेव्हा येते तेव्हा प्लॅस्टीकचे काटे–चमचे धुवून वापरले जातात, सँडविच बॅग्ज पुसून ठेवल्या जातात आणि वर्तमानपत्र ज्या प्लॅस्टीकच्या पुंगळीतून येतात त्या पिशवीचा वापर कसा करायचा यावर विचार केला जातो. डागाळलेलं फळ कचऱ्याच्या टोपलीचा रस्ता शोधत नाही. ते नीट कापून, खराब झालेला भाग काढून टाकून उरलेला भाग सक्तीने खाऊ घातला जातो. ह्याचं आता मला कोडं पडत नाही. घरच्या भाज्या गावभर विकणे, गाड्या धुवून देणे आणि वृत्तपत्रे घरोघरी टाकणे अशी कामं करुन जॉन संसाराला हातभार लावत होता.

१९३९ साली बारावी पूर्ण करुन मस्कींगम् कॉलेजमध्ये BS (Chemistry) ला त्याने प्रवेश घेतला. थोडी शिष्यवृत्ती, थोडी नोकरी, थोडं कर्ज आणि बराचसा आई–बाबांचा आधार ह्या जोरावर त्याने कॉलेजची दोन वर्ष पूर्ण केली. पण त्याचं विमानाचं वेड गेलं नव्हतं. इतक्यात एका जाहिरातीने त्याचं लक्ष गेलं आणि आई बाबांचा विरोध धुडकावून, कॉलेजला रामराम ठोकून अमेरिकन व्यापारी खात्याच्या नागरी हवाई दलात जॉन दाखल झाला. काही महीन्यातच निष्णात वैमानिक होऊन स्वतंत्र उड्डाणाचा परवाना देखील त्याने मिळवला. आता त्याला आपलं कसब बाबांसमोर सप्रमाण सिद्ध करून दाखवायचं होतं. बाबांना बोलावून त्याने विमानात बसवलं आणि रुबाबात म्हणाला, "चला! एक चक्कर टाकून येऊ!". दोन तरुण वैमानिक जेमतेम बसतील एवढ्या छोट्या विमानात २३० पौंडी आडदांड बापाला बसवल्यामुळे विमानावर काय परिणाम होईल ह्याची यत्किंचित कल्पना जॉनला नव्हती. धावपट्टीवर विमानाने वेग घेतला. जॉनने कळ खेचली. विमान हवेत उडालं आणि... आणि इंचा–इंचाने उंची गाठू लागलं. दूरवरची

झाडी झपाट्याने जवळ येउ लागली. धावपट्टी केव्हाच मागे पडली होती. झाडांचे शेंडे विमानाच्या पोटावरची धूळ झाडून गेले. आता झाडं मागे पडली आणि... आणि विमान अजानक सूं करत खाली उतरु लागलं. आता मस्कींगम नदीत डूबकी मारायची वेळ येणार असं वाटलं. महत्प्रयासाने विमानाची दिशा जॉनने बदलेली आणि अखेर एकदाचं विमान उंच हवेत झेपावलं. स्थिरावलं. चोरट्या नजरेनं जॉनने बापाकडे पाहीलं. बापाचे डोळे मिस्कीलपणे चमकत होते. खुर्चीला घट्ट धरलेला हात सोडत, एक दीर्घ श्वास घेत बाप म्हणाला, "अरे वा! अशी धमाल मजेची, थरारक उड्डाणं करायला आवडतात होय तुला?"

एवढ्यात नशिबाने पुढची खेळी खेळली. जपानने पर्ल हार्बरवर हल्ला चढवला. अमेरिका दुसऱ्या महायुद्धात गोवली गेली. पणजोबा आणि बाबांच्या पावलावर पाऊल टाकून अमेरिकेच्या संरक्षणार्थ जॉन महायुद्धात उडी घ्यायला तयार झाला. आई–बाबांनी साश्रू नयनांनी पण अभिमानाने परवानगी दिली. जॉनला अजून एका परवानगीची गरज होती. वयाच्या दुसऱ्या वर्षी ज्या पाळणाघरात जॉनची सोय केली होती तिथे गावच्या डॉक्टरच्या तीन वर्षाच्या मुलीशी, ॲनी कॅस्टरशी, त्याची मैत्री झाली. त्या कृश, लाजऱ्या, काळ्या केसांच्या ॲनीला चाचरत बोलायची सवय होती. मोठेपणी तो तिचा तोतरेपणा इतका वाढत गेला की तिला एक वाक्यसुध्दा सलग बोलता येईनासं झालं. फोनवरुन चौकशी करणं, ब्यूटी पार्लरची किंवा हेअर ड्रेसरची अपॉईंटमेंट घेता येईनाशी झाली. दुकानामध्ये वस्तूंची चौकशी करणे, भाव विचारणे ह्या गोष्टीही तिला करता यायच्या नाहीत. तरीही ती प्रयत्न सोडायची नाही. लोक हसायला लागायचे. चेष्टा करायचे. वयाची चौपन्न वर्षं तोतरेपणाशी लढा देऊन शेवटी तिने त्याच्यावर विजय मिळवला आणि जॉन जेव्हा निवडणुकीला उभा राहीला तेव्हा तिने हजारोंच्या जनसमुदायासमोर भाषणं ठोकली! १९४२ साली वयाच्या एकवीसाव्या वर्षी अमेरिकन मरीन कोअर मध्ये रुजू व्हायला जाणाऱ्या प्रियकराचं चुंबन घेताना त्या स्पर्शातून जॉनला प्रेमाचा अर्थ तिने सांगितला. आंतरिक ओढ, मैत्री आणि आदर यांच्या त्रिवेणी संगमातून निर्माण झालेलं त्यांचं प्रेम आजच्या घटकेला गेली सत्याऐंशी वर्ष टिकून आहे.

अमेरिकन नौदलाच्या प्रशिक्षणात जॉनने चमकदार कामगिरी केली आणि त्याची फायटर पायलट म्हणून नेमणूक झाली. १९४३ साली जॉन आणि ॲनी यांच लग्न झालं आणि काही महीन्यातच तो महायुद्धात भाग घेण्यासाठी रवाना झाला. हवाई पासून जपान पर्यंत ज्या ज्या भूभागावर जपान्यांनी कब्जा मिळवला होता त्या–त्या ठिकाणातून त्यांना हुसकावून लावण्याची जवाबदारी जॉनच्या सैन्यदलाची होती. तब्बल दोन वर्ष, आठ महिने चाललेल्या घनघोर संग्रामात अनेक हवाई हल्ले यशस्वी करुन, अनेक वेळा जायबंदी झालेलं विमान सुखरुप परत आणून, मरणांचा वर्षाव करत, मरणांचा वर्षाव झेलत जॉन लढत राहिला. त्याला शौर्याबद्दल चार Distinguished Flying Crosses आणि अठरा Air Medals बहाल करण्यात आली. शेवटी १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने शरणागती पत्करली. महायुद्धानंतर तो नौदलात प्रशिक्षक म्हणून रुजू झाला. शिवाय नव–नव्या विमानांची चाचणी करण्याचं अत्यंत धोकादायक कामही त्याने आनंदाने स्वीकारलं. एकदा चाळीस हजार फुटावर शस्त्रास्त्र चाचणी करताना विमानालाच भगदाड पडून decompression चा झटका बसला. सर्व यंत्रणा नाकाम झालेल्या असूनदेखील प्रसंगावधान राखून त्याने स्वतःचा जीव वाचवला आणि विमान जमिनीवर उतरवलं. पुन्हा १९५३ सालच्या कोरीयन युद्धात शेकडो स्वाऱ्या यशस्वी केल्या. युद्धसमाप्ती नंतर शिक्षण पूर्ण करून नौदलातून पदवी प्राप्त केली.

आता अमेरिका रशिया शीतयुध्दाला सुरुवात झाली होती. अंतराळावर कब्जा मिळवण्याची चुरस निर्माण झाली होती. विमानं वेगवान होऊ लागली होती. जॉन ग्लेनला आता coast to coast सलग उड्डाण करून विक्रम निर्माण करायचा होता. पण विमानांमध्ये इतकं इंधन ठेवण्याची क्षमता नव्हती. म्हणून पुन्हा एकदा एक जुगारी खेळी त्याने यशस्वी केली.

Air to Air इंधन पुरवण्याची चाचणी यशस्वी केली. ह्याचा फायदा घेऊन १९५७ साली कॅलिफोर्निया ते न्यूयॉर्क हे अंतर सुपसॉनिक वेगाने ३ तास, २३ मिनिटं आणि ८.४ सेकंदात पार करुन त्याने विश्वविक्रम निर्माण केला. त्या उड्डाणादरम्यान तीन वेळा Air to Air इंधन पुरवठा करण्यात आला.

ह्या अद्वितीय कारकिर्दीच्या जोरावर ज्या पहिल्या सात अंतराळवीरांची निवड करण्यात आली त्यात जॉन ग्लेन होता! नासाच्या पहिल्या वहिल्या प्रोजेक्ट मर्क्युरीचे हे सात शिरोमणी! पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाला भेदून अवकाशात पदार्पण करणारे वेडेपीर! दीर्घकाळ चाललेल्या प्रशिक्षणानंतर फेब्रुवारी २०, १९६२ रोजी 'Friendship 7' ह्या यानातून जॉन ग्लेन एकटा अवकाशात गेला. पाच तासात पृथ्वीला तीन प्रदक्षिणा घालून पुन्हा पृथ्वीवर परत आला. पृथ्वीला प्रदक्षिणा घालणारा हा पहिला अमेरिकन नागरिक.

एका क्षणात जॉन ग्लेन अमेरिकेचा 'हिरो' झाला. त्याचा ठिकठिकाणी सत्कार झाला. त्याच्या गावात त्याची मिरवणूक काढण्यात आली. नासाकडे जॉन ग्लेनच्या नावाने इतकी पत्रं आली की नासाला खास 'जॉन ग्लेन' टपाल खोली उघडावी लागली. त्या पत्रांमध्ये काही औत्सुक्यपूर्ण तर काही मासलेवाईक पत्रही होती. उदा.

'माझा मित्र आणि मी मिळून आमच्या घरी रॉकेट बनवत आहोत तर तुमच्या रॉकेटची 'ब्लू प्रिंट' तसेच तुम्ही कोणतं इंधन वापरता याची सविस्तर माहिती त्वरित कळवावी.'

' तुमच्या पृष्ठभागाखाली आगीचा प्रचंड लोळ पेटवून तुम्हाला आकाशात धाडून दिलं हे आम्ही शाळेत दूरदर्शन वर पाहिलं!'

आणखी एका पत्रात एका बछडीने तिच्या पत्राच्या शेवटी झकास ओळ लिहिली होती:

'ता. क. मी तुमच्या काळजाची स्पंदनं ऐकली!' नासाने जॉनच्या हार्ट मॉनिटरचा आवाज दूरदर्शनच्या प्रेक्षकांना ऐकू जायची व्यवस्था केली होती. अमेरिकेच्या लोकांच्या काळजाची स्पंदनं त्या पत्रांद्वारे जॉनला ऐकू आली! ह्या पत्रांचं पुढे एक पुस्तक प्रसिध्द करण्यात आलं. अखेर १९६५ साली २३ वर्षांच्या सेवेनंतर जॉन

अमेरिकन मरीन कोर मधून निवृत्त झाला.

त्याच्या आयुष्याने आता वेगळंच वळण घेतलं. अमेरिकन जनमानसावर जॉन ग्लेनचा ठसा उमटला होता. त्यामुळे पुढारीपणाची माळ त्याच्या गळ्यात येऊन पडली. तो डेमोक्रॅटिक पक्षाचा सिनेटर व्हावा अशी मागणी पुढे आली आणि १९७५ साली जॉन पहिल्याच निवडणूकीत निवडून आला. पुढची २० वर्षे त्याने अमेरिकन राजकारणात घालवली. १९९८ साली सिनेटर ग्लेन वयाच्या ७७व्या वर्षी राजकारणातून निवृत्त झाला.

पण निवृत्त होण्यापूर्वी त्याने स्वत:च्या नशीबालाच आव्हान दिलं होतं! कॉंग्रेसमधे काम करतांना त्याच्या नजरेत नासाचा एक अहवाल आला. ह्या अहवालात अवकाश प्रवासाचे तब्येतीवर होणारे दुष्परिणाम कोणते ह्याची माहिती होती. ह्या अहवालाप्रमाणे मुख्यत: स्नायू कमकुवत होणे, हाडे ठिसूळ होणे, रुधिराभिसरण अनियमीत होणे, तोल जाणे, रोगप्रतिकारक शक्ती, अन्नपचन, झोप व औषधांचा परिणाम कमी होणे अशा तऱ्हेचे परिणाम नोंदवले होते. अंतराळावीर पृथ्वीवर परतले की गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाने काही दिवसातच त्यांची तब्येत पूर्ववत होते असाही एक निष्कर्ष काढला होता. ह्या बाबींचा विचार करता जॉन च्या मनात आले, " तब्येतीवरचे हे परिणाम तंतोतंत वृध्दत्वामुळे घडणाऱ्या बदलांशी जुळताहेत. असं जर असेल तर मग एखाद्या वृध्दालाच अवकाशात पाठवलं तर काय होईल? वृध्दत्वामुळे हे बदल आधीच घडलेले असल्यामुळे अवकाश प्रवासाचा त्यांच्यावर दुष्परिणाम कमी होईल? की आणखी वाढेल? वाढले तर पृथ्वीवर परतल्यावर कमी होतील का? वृध्दांना अवकाशात कितपत धोका आहे हे कसं आजमावायचं ? त्यासाठी प्रयोग करणे आवश्यक असल्यास स्वत:वरच का प्रयोग करू नयेत?" झालं! जॉन ग्लेनने नासाच्या अधिकाऱ्यांना हे संशोधन करणं कसं महत्वाचे आहे हे पटवून दिलं, आणि त्यासाठी, स्वयंसेवकगिरी करायची तयारी दर्शवली. 'जॉन ग्लेन राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे त्यांना अवकाशात पाठवायचा धोका पत्करू नका' असा आदेश त्याकाळचे अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी यांनी दिला होता. त्याच्यावर उतारा म्हणून पुढे, अमेरिकेचे अध्यक्ष क्लिंटन यांच्याकडे जॉनने या कामगिरीस परवानगीचा लकडा लावला. पण जॉनचा मुलगा डेव्ह, मुलगी लिन् आणि पत्नी ॲनी तिघेही विरोधात उभे राहिले. 'काय हा म्हातारचळं? अवघे पाउणशे वयमान असून पुन्हा अंतराळात जायची तयारी? जरा विश्रांती घेऊन हरी भजनाकडे वळा जरा' असा घरच्यांनी त्याला सल्ला दिला. शेवटी जॉन पोरांची आणि प्रियेची समजूत काढत म्हणाला, " काळजी करू नका.आता तर अवकाश प्रवास अगदी सुरक्षित झालायं! मी सुरक्षित परत येईन आणि समजा नाही आलो, तर बिघडलं कुठे? शेवटच्या क्षणापर्यंत मला जे काम करायला आवडतं तेच मी करत होतो हे समाधान मला पुरेसं होईल." आणि ऑक्टोबर 29, 1998 रोजी पुन्हा एकदा जॉन ग्लेन अंतरिक्षात पोचला.

८९ वर्षाचा जॉन आणि ९० वर्षाची ॲनी वॉशिंग्टन डी सी आणि न्यू कॉंकॉर्ड, ओहायो ह्या खेड्यात अजूनही राहतात. त्याच्या अफलातून आयुष्याच्या आठवणी त्याने जपून ठेवल्या आहेत व त्याचा आता म्युजियम केला गेला आहे. त्याचा वस्तुसंग्रह त्याने जपून ठेवला आहे. त्याच्या वाट्याला आलेली कोणतीही गोष्ट, विशेषत: कोणताही क्षण त्याने फुकट घालवलेला नाही. अंतराळ प्रशिक्षणात काही वेळा त्यांना गुडुप अंधारात ठेवण्यात येत असे. कारण अंतराळात असा अंधार बाहेर असतो. त्या अंधारात बुध्दी तल्लख ठेवण्याचं काम ह्या अंतराळ प्रशिक्षणात त्याना करावं लागत असे. अशावेळी जॉन मनातल्या मनात कविता करायचा. त्यातल्या त्याला आवडलेल्या खालील काही ओळी त्याच्या आयुष्याची कहाणीच सांगून जातात:

" Then use all your inborn talents
Use them each and every day
Add to mankind's store of knowledge,
Make them glad you passed this way."

मनुष्य गुणांचे आगर
कराहो क्षणोक्षणी वापर
करूनी प्रगल्भ ज्ञान रत्नाकर
सुखवाहो जनांसी निरंतर!

******************************